महत्वाचे / मुदतीचे

सामान्य प्रशासन कार्यालय
आस्थापना विभाग, पुणे मनपा
जावक क्र.:- साप्रवि/आस्था/प्र.४/ ५६८९
दिनांक :- २८/०५/२०२२

## -: कार्यालयीन परिपत्रक :-

विषय :- पुणे मनपाचे विविध खात्यांकडील श्रेणी - १ ते श्रेणी - ४ या संवर्गातील सेवकांपैकी ज्यांचे वयास दि.०१/०४/२०२२ ते ३१/०३/ २०२३ अखेरच्या मुदतीत अनुक्रमे ५८ व ६० वर्षे पूर्ण होतात त्यांना पुणे महानगरपालिका सेवेतून वयोपरत्वे सेवानिवृत्त करणेबाबत.

सन २०२२ - २०२३ या आर्थिक वर्षामध्ये म्हणजेच दि.०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२३ अखेरच्या मुदतीत मनपाच्या विविध खात्यातील श्रेणी - १ ते श्रेणी - ४ या संवर्गातील सेवकांच्या वयास अनुक्रमे ५८ वर्षे व ६० वर्षे पूर्ण होतील त्यांना पुणे महानगरपालिका सेवेतून वयोपरत्वे निवृत्त करणे आवश्यक आहे.

१) उपरोक्त मुदतीत ज्या सेवकांना नियत वयोमानाप्रमाणे वयोपरत्वे सेवानिवृत्त करावयाचे आहे, अशा सर्व सेवकांची तपशीलवार माहिती सोबत दिलेल्या तक्त्यात द्यावी. तसेच ही माहिती श्रेणी – १, श्रेणी – २, श्रेणी – ३, व श्रेणी – ४, या प्रमाणे विभागणी करून पाठविण्यात यावी. सदर माहिती पाठविण्यापूर्वी सर्व संबंधितांची सेवापुस्तके व पगार बिले तपासून पहावीत. नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणेस पात्र कोणत्याही सेवकाचे नाव वगळण्यात आलेले नाही, याची खात्री करून घ्यावी.

२) आपल्या खात्यातील संकलित केलेल्या माहितीची तपासणी करून ती बरोबर असल्याची खात्री प्रशासन अधिकारी/अधिक्षक/उप अधिक्षक यांनी करावी त्यांची नावे यादीमध्ये स्वाक्षरीखाली नमूद करावीत. माहिती सुवाच्च व नावे, जन्म दिनांक इ. अचूक असेल आणि माहितीमध्ये काहीही त्रुटी राहणार नाही याची जबाबदारी संबंधित प्रशासन अधिकारी/अधिक्षक/उप अधिक्षक यांची राहील.

३) सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर सदर यादीमध्ये सेवकाचे नाव समाविष्ट करण्यासाठी काही खात्याचे स्वतंत्र प्रस्ताव मान्यतेसाठी सादर केले जातात, त्याच प्रमाणे काही सेवक सेवानिवृत्ती तारखेनंतरही कार्यरत राहिलेनंतर त्याचे सेवानिवृत्तीचे आज्ञापत्रक प्रसृत करण्यासाठी पश्चात मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येतात या बाबी प्रशासकिय